# प्रेस नोट

## सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा, मुंबई.

**"Whatsapp व इतर सोशल मिडीयाच्या माध्यमातुन मैत्री करून त्यांचे आक्षेपार्ह व्हिडीओ व फोटो चित्रीत करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीला सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा, मुंबई यांचेकडून जेरबंद करून छडा लावल्याबाबत"**

---

सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा, मुंबई येथे सेक्सटॉर्शनच्या बऱ्याच तक्रारी प्राप्त होत होत्या. त्यावरून याचा उलगडा करण्यासाठी विशेष पथकाची स्थापना करून तपास करण्यात आला. या दरम्यान नमुद सेक्सटॉर्शनबाबतचे दोन गुन्हे दाखल करण्यात आले असुन गुन्हयाच्या तपासात आंतरराज्यीय टोळी असल्याने राजस्थान, हरियाणा, या राज्यात तपास पथके रवाना करण्यात आली होती. दाखल गुन्हयमध्ये तांत्रिक कौशल्याचा वापर करून यशस्वीपणे तपास करण्यात आला. गुन्हयाच्या तपासात पोलीस पथकांनी हरियाणा व राजस्थान राज्यात छापेमारी केली व यातील मुख्य आरोपी सुत्रधारासह एकूण ३ आरोपींना शिताफीने अटक करून त्यांची संगणकीय साधने ताब्यात घेवुन गुन्हयाची प्रभावीपणे उकल केली आहे.

सदर गुन्हयातील आरोपींची गुन्हयाची कार्यपध्दती अशी होती की, ते फेसबुक, गुगल, व्हॉट्सअप, टेलिग्राम सारखी सार्वजनिक वापराच्या सोशल मिडीयांच्या साधनांचा वापर गुन्हा करण्यासाठी करीत होते. त्यात फेसबुकवर पुजा शर्मा, नेहा शर्मा अशा प्रकारे कोणत्याही परिचित असणाऱ्या महिलांची नावे व महिला सदृश्य फोटो वापरून फेसबुक यावर युजर अकांउट उघडत असे. सदर उघडलेल्या खात्यांच्याद्वारे नमुद बनावट खातेधारक फेसबुक मेसेंजर आणि व्हॉट्सअपवरुन अशा पुरुषांच्या संपर्कात राहतात की, ज्यांचे फेसबुक फ्रेंडलिस्ट मध्ये जास्तीतजास्त मित्र परिवार आहेत. जो इसम नेहमी फेसबुकवर ॲक्टीव्ह आहे आणि तो समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती आहे. अशा व्यक्तीचा सावज म्हणुन शोध झाला की, ते या पुरुषांना हेरून त्यांना व्हिडीओ कॉल करून त्यांना मोहात बळी पाडुन दृष्कृत्ये करण्यास भाग पाडतात. त्यांच्या या कृत्याचा व्हिडीओ मॉर्फ तयार करून तो सोशल मिडीयावरील त्या इसमाचे नातेवाईक व मित्रमंडळी यांना पाठविण्याची धमकी देवुन त्यांची समाजात बदनामी करण्यात येईल असे भय दाखवुन त्यास पैशाची मागणी करून मानसिक त्रास देतात.

सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा, मुंबई. यांनी प्रस्तुत प्रकरणी सोशल इंजिनीअरींग केले असता, अशा प्रकारच्या या गुन्हयात **एकूण ५४ मोबाईल क्रमांकाचा वापर** झाल्याची माहिती निष्पन्न झाली आहे. तसेच अपहार केलेली रक्कम वळती करण्यासाठी आरोपीतांनी पेटीम व फोनपे सारखी वॉलेटसची **एकूण ५८ बँक खाती वापरून १७१ फेसबुक पेजेस, ५ टेलिग्राम चॅनेल्स**, तयार केलेली आहे असे निष्पन्न करण्यात आले आहे. सदरची नमुद पेमेंट वॉलेट्सची खाती, बनावट फेसबुक खाती आणि टेलिग्राम चॅनेल्स बंद करण्यासाठीची कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच अटक आरोपीतांनी गुन्हयाच्या कृतीसाठी व्हिडीओ कसे बनवायचे याबाबत तीन दिवसांचे विशेष प्रशिक्षण घेतल्याची माहिती देखील पोलीस तपासात मिळुन आली आहे. आणि आरोपीतांनी बळीत इसमांच्या शोधासाठी गुगल सर्च इंजिनचा वापर करून ते त्यांचा पाठलाग करत असतात. सदरचे सेक्सटॉर्शन रॅकेट हे पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, हरियाणा राजस्थान या राज्यांच्या काही भागात सुरु असल्याची माहिती तपासातुन प्राप्त झाली आहे.

तरी तमाम जनतेला आवाहन करण्यात येते की, **"१.कुठल्याही अनोळखी व्यक्तीशी फेसबुक सोशल मिडीयावर मैत्री करून नये, २.कुठल्याही अनोळखी व्यक्तीशी फेसबुक मेसेंजर/ व्हॉट्सअप द्वारे कोणत्याही प्रकारे संपर्क करू नये, ३.अनोळखी व्हॉट्सअप नंबरवरून/कोणत्याही अनोळखी नंबरवरून मेसेज अथवा व्हिडीओ कॉल आल्यास त्यास कोणत्याही प्रकारे प्रतिसाद देवू नये, ४. तसेच कोणत्याही रक्कमेची मागणी झाल्यास त्यांना पैसे न देता त्वरीत जवळच्या पोलीस ठाणेशी संपर्क साधावा."**

सदरची प्रभावी कामगिरी मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे), श्री. मिलींद भारांबे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. विरेश प्रभु, मा. पोलीस उप आयुक्त, सायबर गुन्हे, श्रीमती डॉ. रश्मी करंदीकर, यांच्या निगराणीखाली मा. सहा. पोलीस आयुक्त, सायबर विभाग, श्री. नितीन जाधव, यांच्या मागदर्शनाखाली सायबर पोलीस ठाणेचे प्रभारी पोलीस निरीक्षक श्रीमती एस.एस. सहस्रबुध्दे, यांच्या नियंत्रणाखाली तपासी अधिकारी म्हणुन पो.नि. प्रमोद खोपीकर यांनी त्यांचे सहकारी सपोनि रवि नाळे, सपोनि अमित उतेकर, पोउनि खेत्रे पोउनि गणेश शिर्के, पो.ना. हेमंत ठाकुर, पो.शि. मयुर थोरात मपोशि वर्षा वेताळ यांचे मदतीने पार पाडली

Scanned with CamScanner